# यावल महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

यावल( प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिवस वाक्य लेखन स्पर्धा, ललित लेखन स्पर्धा व व्याख्यान अशा विविध उपक्रमांनी मराठी विभागातर्फे साजरा करण्यात आला .

श्री सुभाष कामडी यांनी प्रसिद्ध लेखक वि .वा . शिरवाडकरांच्या साहित्याचा परिचय करून दिला.या प्रसंगी राधिका बुरूजवाले व  रोहिणी पारधे यांनी कुसुमाग्रजांच्या कणा व श्रावण आला या कवितांचे वाचन केले. लेखन कौशल्य व सर्जनशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने घेतलेल्या वाक्य लेखन स्पर्धेत तीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यात अनुक्रमे याज्ञनिका जावळे( टीवायबीएस्सी) प्रथम, नयना बारी (एफवायबीएस्सी) द्वितीय व रूपाली सोनवणे (एसवाय बीए )तृतीय यांनी यश प्राप्त केले .तर ललित गद्य लेखन स्पर्धेत 10 स्पर्धकांनी भाग घेतला. यात अनुक्रमे राधिका बुरूजवाले (एफवायबीकॉम) प्रथम ,महेश अहिरे (टीवायबीए) द्वितीय व याज्ञिका जावळे ( टीवायबीएस्सी )तृतीय यशाचे मानकरी ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांना पेन व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुधीर कापडे यांनी सांगितले की मराठी भाषा ज्ञानसंपन्न असून ती संस्काराची भाषा आहे .चांगली पुस्तके वाचून भाषा समृद्ध करण्याचे त्यांनी आवाहन केले. सदर कार्यक्रम प्राचार्य डॉ.सध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चारुशीला पाटील हिने केले तर आभार कविता चौधरी हिने मानले. कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. सुधा खराटे यांनी

केले. कार्यक्रमास श्री एम. पी .मोरे ,श्री गोपाल जोनवाल ,श्रीमती प्रेमलता जोनवाल व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# यावल महाविद्यालयात विविध स्पर्धा



स्पर्धा विजेत्यांना बक्षीस वाटप करून गौरव महाविद्यालयातील मान्यवर.

**प्रतिनिधी** ।यावल

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिवस वाक्य लेखन, ललित लेखन व व्याख्यान अशा विविध स्पर्धा उपक्रमांनी उत्साहात साजरा झाला.

या निमित्त मराठी विभागातर्फे यानिमित्त वाक्य लेखन, ललित लेखन व व्याख्यान या स्पर्धा घेण्यात आल्या . प्रारंभी सुभाष कामडी यांनी थोर साहित्यिक वि.वा. शिरवाडकरांच्या साहित्याचा परिचय करून दिला. राधिका बुरूजवाले व रोहिणी पारधे यांनी त्यांच्या कवितांचे वाचन केले. वाक्य लेखन स्पर्धेत ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यात अनुक्रमे याज्ञिका जावळे, प्रथम, नयना बारी द्वितीय व रुपाली सोनवणे तृतीय या विद्यार्थिनींनी यश प्राप्त केले. ललित गद्य लेखन स्पर्धेत १० स्पर्धकांनी भाग घेतला. यात अनुक्रमे राधिका बुरूजवाले प्रथम, महेश अहिरे द्वितीय व याज्ञिका जावळे तृतीय हे यशाचे मानकरी ठरले.

यशस्वी विद्यार्थ्यांना पेन, पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष डॉ.सुधीर कापडे यांनी चांगली पुस्तके वाचून भाषा समृद्ध करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ.सध्या सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ.सुधा खराटे यांनी केले.